महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : एनओटी-३६१७/सी.आर.२४/२०२०/जाहिरात

दिनांक ३१ मार्च, २०२२

## - : **घोषणा** :-

**विषय :- राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२१ - अर्ज सादर करण्याबाबत.**

जाहिरात क्रमांक १०६/२०२१ दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ नुसार आयोगामार्फत रविवार दिनांक २३ जानेवारी, २०२२ रोजी घेण्यात आलेल्या राज्यसेवा पूर्व परीक्षा-२०२१ चा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे. सदर निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकाद्वारे व्यक्तिगतरित्या कळविण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा-२०२१ च्या अधिसूचनेचे काळजीपूर्वक अवलोकन करुन आयोगाच्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळाद्वारे दिनांक १४ एप्रिल, २०२२ पर्यंत अर्ज सादर करणे तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्काचा भरणा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता पात्र समजण्यात येणार नाही.

**३.** आयोगास अर्ज सादर करण्याची तसेच परीक्षा शुल्काचा भरणा करण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण न केल्यास यासंदर्भातील तक्रारींची नंतर दखल घेतली जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात विहित दिनांकानंतर संपर्क साधल्यास त्याचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

ठिकाण : मुंबई

सह सचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग